( )

**विशेष दिवाणी दावा क्र. १६/२०२५**
**बाळु**
**विरुध्द रंजना**
**निशाणी क्र. २६**

**<u>पडताळणी</u>**

**माझे नाव –** तानाजी बन्सी थोरात
**वय-** ४२ वर्षे धंदा शेती
**रा. खडकनारळा** ता. गंगापुर जि. औरंगाबाद

असे असुन शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

**<u>समक्ष</u>**

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.02.18 17:49:58 -0100

रोहीत नं. पाठक

दिनांकः- १८.०९.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर

**<u>पुढील सरतपास वादी तर्फे विद्यीज्ञ व्ही.एस.काळे शपथेवर सुरु</u>**

मला नि. १४ वरील विक्री करारनामा दाखवण्यात आला. त्यात लिहीलेला मजकुर बरोबर आहे. त्यावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे.

**<u>श्रवणोत्तर स्विकृत</u>**

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.02.18 17:49:53 -0100

रोहीत नं. पाठक

दिनांकः- १८.०९.२०२५ **सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**गंगापूर**

( )

**विशेष दिवाणी दावा क्र. १६/२०२५**
**बाळु**
**विरुध्द रंजना**
**निशाणी क्र. २६**

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विद्यीज्ञ श्री वाय.एन.जाधव यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>**

न्यायालयामार्फत साक्ष देण्यासाठी मला समन्स, नोटीस आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी वादीच्या सागण्यावरुन पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. वादी माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यात पैशांची देवाण घेवाण होत होती. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासात नमुद इसारपावतीवर मी साक्षीदार म्हणुन सही करण्यापुर्वी वाचली नव्हती. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी रस्त्याने जात असताना मला बोलावुन घेतले व सही करण्यास सांगितले. वादी व प्रतिवादीत इसारपावतीप्रमाणे व्यवहार झाला होता किंवा नाही मला सांगता येत नाही. माझ्या सरतपासात नमुद की माझ्या समक्ष वादीने प्रतिवादीला सहा लाख रुपये दिले होते याबाबत मला माहिती नाही. वादी व प्रतिवादीत दोन वर्षाच्या आत खरेदीखत करुन देण्याचे ठरले होते किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादीच्या सांगण्यावरुन साक्ष देण्यासाठी आलो आहे व त्याच्या सांगण्यावरुनच पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.02.18 17:50:03 -0100

रोहीत नं. पाठक

दिनांकः- १८.०२.२०२५

**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**गंगापूर**